# पुणे विद्यापीठ

**महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४,कलम २५(२)(आर) नुसार विद्यापीठाच्या अधिसभेवर १० (दहा) नोंदणीकृत पदवीधरांची निवडणूक**

## निवडणूक सूचना

**महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २५(२)(आर) मधील तरतूदीनुसार विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांमधून विद्यापीठाच्या अधिसभेवर १० (दहा) नोंदणीकृत पदवीधरांना निवडून देण्यासाठी परिनियम ३६६ नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.**

१) मंगळवार, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० रोजी प्रसिध्द केलेल्या तात्पुरत्या मतदार यादीस सुचविण्यात आलेल्या पुस्ती व दुरुस्त्या विचारात घेऊन तसेच जाहिरात क्रमांक ६६, दिनांक ३ डिसेंबर, २०१० नुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीचा विचार करुन मा. कुलगुरु यांनी मान्य केलेल्या अंतिम मतदार यादीप्रमाणे ही निवडणूक घेण्यात येईल.

२) निवडणूकीसाठीच्या जागा : एकूण जागा १०, पैकी ५ जागा खुल्या प्रवर्गासाठी असून ५ जागा खालीलप्रमाणे राखीव प्रवर्गासाठी आरक्षित आहेत.

१) महिला (Woman) - १ जागा
२) अनुसूचित जाती (Scheduled Caste) - १ जागा
३) अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) - १ जागा
४) विमुक्त जाती/भटक्या जमाती (D.T/N.T.) - १ जागा
५) इतर मागास प्रवर्ग (O.B.C.) - १ जागा

३) सदर निवडणूकीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख, वार, वेळ व स्थळ (परिनियम ३६६,३६७) | शुक्रवार दि.७ जानेवारी, २०११ दुपारी ४.०० वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे-७ |
| २ | उमेदवारी अर्जांच्या छाननीची तारीख, वार, वेळ व स्थळ (परिनियम ३७१) | शुक्रवार दि.७ जानेवारी, २०११ सायंकाळी ५.०० वाजता | क्लासरुम कॉम्प्लेक्स इमारत, आरोग्य केंद्राच्या समोर, पुणे विद्यापीठ, पुणे-७ |
| ३ | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख, वार, वेळ व स्थळ (परिनियम ३७०) | सोमवार, दि.१० जानेवारी, २०११ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे-७ |
| ४ | निवडणूकीची तारीख, वार, वेळ व स्थळ (परिनियम ३६६) | रविवार, दि. १६ जानेवारी, २०११ सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | या निवडणूक सूचनेसोबत जोडलेल्या मतदान केंद्रावर. |
| ५ | मतपत्रिकांची छाननी व मतमोजणी | मंगळवार, दि.१८ जानेवारी, २०११ सकाळी ८.०० वाजता | क्लासरुम कॉम्प्लेक्स इमारत, आरोग्य केंद्राच्या समोर, पुणे विद्यापीठ, पुणे-७ |

४) **उमेदवारी अर्ज**

उमेदवारी अर्ज व उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करुन घ्यावा आणि उमेदवारी अर्ज सादर करतेवेळी अर्जाची किंमत रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) व उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज सादर करतेवेळी अर्जाची किंमत रु. १०/-(अक्षरी रुपये दहा फक्त) रोख स्वरुपात निवडणूक विभाग, पुणे विद्यापीठ येथे जमा करावी.

५) **उमेदवारांसाठी आवश्यक पात्रता** :

i) उमेदवार हा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २५(२)(आर) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अध्यापक (नियमित/कंत्राटी), प्राचार्य, विभागप्रमुख, व्यवस्थापन या प्रवर्गामधील किंवा या पोट-कलमामध्ये नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रवर्गात समावेश होणारा नसावा.

ii) निवडणूक तारखेपूर्वी किमान १० वर्षे अगोदर उमेदवाराने पदवी प्राप्त केलेली असावी.

iii) उमेदवार संलग्नित महाविद्यालये/संस्था/मान्यताप्राप्त परिसंस्थेचा पदाधिकारी/विश्वस्त असू नये.

अ) योग्यरितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी दाखल केलेले, उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील. (परिनियम ३६७ व ३६९).

ब) राखीव जागेसाठी उमेदवाराने सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

क) मतदार यादीत समाविष्ट असलेले संबंधित मतदार संघातील कोणतेही दोन मतदार, मतदार यादीत समाविष्ट असलेल्या व उमेदवार म्हणून उभे राहण्यास पात्र असलेल्या व्यक्तीस उमेदवार म्हणून सूचित किंवा अनुमोदित करु शकतात. (परिनियम ३६९)

ड) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवार नसतील तर ते सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल. (परिनियम ३७२)

इ) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करण्यात येईल. याबाबतचे प्रकटन विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

ई) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १४ सप्टेंबर, २००९ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन अर्ज ग्राह्य धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे तसेच पात्रता शर्तींच्या ग्राह्यतेसंबंधीच्या नियमांबाबत विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ११३/२०१०, दि. २ ऑगस्ट, २०१० यांच्या प्रती विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर Act/Statute या लिंकवर उपलब्ध आहेत.

६) उमेदवारी अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल.

१. अंतिम वर्षाचे/सत्राचे गुणपत्रक किंवा उत्तीर्णता प्रमाणपत्र (Passing Certificate) किंवा पदवी प्रमाणपत्र किंवा स्पेशल प्रमाणपत्र.

२. मागासवर्गीयांकरिता राखीव असलेल्या जागेसाठी उमेदवाराने सक्षम अधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र.

३. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,१९९४ कलम २५(२)(आर) मध्ये नमूद केल्यानुसार अध्यापक (नियमित/कंत्राटी), प्राचार्य, विभागप्रमुख, व्यवस्थापन या प्रवर्गामधील किंवा या पोटकलमामध्ये नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रवर्गात समावेश नसल्याबाबत तसेच संलग्नित महाविद्यालये, संस्था, मान्यताप्राप्त परिसंस्थेचा पदाधिकारी/विश्वस्त नसल्याबाबतचे नामनिर्देशनपत्रासोबत जोडलेल्या विहित नमून्यातील हमीपत्र.

७) उमेदवारी अर्ज छाननी आणि मतमोजणीच्यावेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे त्याच मतदार यादीतील अधिकृत केलेला त्याचा प्रतिनिधी एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.

८) मतदारांनी मतदार नोंदणीच्यावेळी निवडलेल्या व त्यानुसार अंतिम मतदार यादीमध्ये नमूद केलेल्या मतदान केंद्रावरच मतदान करावयाचे आहे. मतदान केंद्र कोणत्याही परिस्थितीत बदलून देण्यात येणार नाही.

९) मतदानास येताना मतदारांनी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा ते ज्या संस्थेत सेवेत आहेत तेथील नियुक्त्याने फोटोसहित दिलेले ओळखपत्र किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले फोटोसहित ओळखपत्र किंवा आयकर अधिका-यांनी (Income Tax) दिलेले फोटोसहित ओळखपत्र किंवा तत्सम फोटोसहित ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **मतदान केंद्रावरील निवडणूक अधिका-यांना हे ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतदारांना मतपत्रिका मिळणार नाही.**

१०) ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीनुसार एकक संक्रमणीय मतानुसार परिनियमांव्दारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल. या निवडणूकीसाठी मतदान हे पसंतीनुसार प्राधान्यक्रम या पध्दतीने करावयाचे आहे.(परिनियम ३५७)

मा. कुलगुरु यांच्या आदेशावरुन

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ क्र. पुविनि/२५(२)(आर)/ ५४९ )
दिनांक : २१ डिसेंबर, २०१० )
)

( डॉ. मा. ल. जाधव )
**कुलसचिव**

**प्रत: सर्व संबंधित मतदार**

## नोंदणीकृत पदवीधर मतदार संघ मतदान केंद्रांची यादी

| मतदान केंद्र क्र. | मतदान केंद्राचे नाव |
|---|---|
| 1 | पुणे विद्यापीठ, पुणे-7 |
| 2 | सी.वाय.दांगट (पाटील) शिक्षण आणि क्रिडा मंडळाचे शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, वडगाव बु.// पुणे 411041. |
| 3 | माईर्स महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे 411 038. |
| 4 | आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे 411 004. |
| 5 | सर परशुरामभाऊ महाविद्यालय, टिळक रोड, पुणे |
| 6 | फर्ग्युसन महाविद्यालय, डेक्कन, पुणे 411 030 |
| 7 | एच.व्ही.देसाई महाविद्यालय, बुधवार पेठ, पुणे 411 002. |
| 8 | नौरोसजी वाडीया महाविद्यालय,पुणे 411001 |
| 9 | एम.ई.एस.इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट करिअर कोर्सेस, 131, मयूर कॉलनी, कोथरुड, पुणे- 411 029 |
| 10 | अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे 411 028. |
| 11 | महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी-वाघिरे पुणे 411 017. |
| 12 | अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर 412 206. |
| 13 | अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, सासवड 412 301 जिल्हा पुणे. |
| 14 | तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती 413 102 जिल्हा पुणे |
| 15 | इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इंदापूर. 413 186 जिल्हा पुणे |
| 16 | नायगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, दौंड 413 801 जिल्हा पुणे |

| | |
|---|---|
| 17 | सी.टी.बोरा महाविद्यालय, शिरूर 412 210 जिल्हा पुणे. |
| 18 | हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर 410 505 खेड, जिल्हा पुणे. |
| 19 | बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव |
| 20 | श्री. शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर 410 502 जिल्हा पुणे. |
| 21 | इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव-दाभाडे 410 507 ता.मावळ, जिल्हा पुणे |
| 22 | पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर 414 001. |
| 23 | एस.एस.एस.पी.एम. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहूरी 413 705 जिल्हा - अहमदनगर |
| 24 | आर.बी.एन.बी.महाविद्यालय, श्रीरामपूर 413 709 जिल्हा - अहमदनगर |
| 25 | पी.व्ही.पी. महाविद्यालय प्रवरानगर 413713 ता.राहाता, जिल्हा - अहमदनगर |
| 26 | के.जे.सोमय्या महाविद्यालय, कोपरगांव 423601 जिल्हा - अहमदनगर |
| 27 | सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा - अहमदनगर |
| 28 | श्री.ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा 414 603 जिल्हा - अहमदनगर |
| 29 | अकोले तालुका शिक्षण मंडळाचे, कला, वाणिज्य आणि दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले 422 601 जिल्हा - अहमदनगर |
| 30 | न्यू आर्टस्, कॉमर्स अ्ॅण्ड सायन्स महाविद्यालय, शेवगांव 414 502 जिल्हा - अहमदनगर |
| 31 | बाबुजी आव्हाड कला व वाणिज्य महाविद्यालय, पाथर्डी 414 102 जिल्हा - अहमदनगर |
| 32 | जामखेड महाविद्यालय, जामखेड 413 201 जिल्हा - अहमदनगर |
| 33 | दादा पाटील महाविद्यालय, कर्जत 414 402 जिल्हा - अहमदनगर |
| 34 | श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा 413 701 जिल्हा - अहमदनगर |
| 35 | न्यू आर्टस्, कॉमर्स अ्ॅण्ड सायन्स महाविद्यालय, पारनेर 414 302 जिल्हा - अहमदनगर |

| | |
|---|---|
| **36** | एच.पी.टी. कला व आर.वाय.के. विज्ञान महाविद्यालय, नाशिक 422 005 |
| **37** | क्रांतिवीर वसंतराव एन. नाईक महाविद्यालय, कॅनडा कॉर्नर, नाशिक-2 |
| **38** | भोसला मिलिटरी महाविद्यालय, नाशिक 422 005 |
| **39** | के.के.वाघ इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन अॅडण्ड रिसर्च,पंचवटी, नाशिक 422 003 |
| **40** | एन.डी.एम.व्ही.पी.चे कै.शांताराम कोंडाजी वावरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सिडको, नाशिक 422 009 |
| **41** | आर.एन.सी. कला, जे.डी.बी.वाणिज्य व एन.एस.सी.विज्ञान महाविद्यालय नाशिक रोड. नाशिक 422 101 |
| **42** | गुरूवर्य मामासाहेब दांडेकर कला व भंगवत वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिन्नर 422 103 जिल्हा नाशिक |
| **43** | के.पी.जी. कला व वाणिज्य महाविद्यालय, इगतपुरी 422 403 जिल्हा नाशिक |
| **44** | एन.डी.एम.व्ही.पी. कला व वाणिज्य महाविद्यालय, दिंडोरी, जि. नाशिक |
| **45** | के.के.वाघ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपळगांव बसवंत 422 209 ता.निफाड, जिल्हा नाशिक |
| **46** | एन.डी.एम.व्ही.पी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मनमाड 423 104 ता.नांदगाव, जिल्हा नाशिक |
| **47** | कळवण एज्युकेशन सोसायटीचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कळवण 423 501 जिल्हा नाशिक |
| **48** | एन.जे.बी.ए.टी कर्मवीर के.एच.ए. कला आणि एम.जी.एल. वाणिज्य महाविद्यालय, चांदवड 423 101 जिल्हा नाशिक |
| **49** | कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय देवळा 423 102 जिल्हा नाशिक |
| **50** | कर्मवीर आबासाहेब उर्फ एन.एम.सोनवणे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सटाणा 423 301 ता.बागलाण, जिल्हा नाशिक |
| **51** | महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प 423 105 जिल्हा नाशिक |
| **52** | स्वामी मुक्तानंद विज्ञान महाविद्यालय, येवला 423 401 जिल्हा नाशिक |